आबूंना (सास-यांना) बरे वाटत नाही म्हणून सतिश फोन आल्या बरोबर पुण्याला गेला. असेंब्ली चालू होती. चार दिवसांनी त्याला वाटले की भुवनेश्वरला जलद फेरी करून ऑफिसची महत्वाची कामे संपवावी. स ने मी आता भुवनेश्वरला परत जातो महिन्याची रजा काढून लगेच येतो. मी जाऊना, असे त्यांना विचारून पुणे सोडले. मोठ्या दीदीने आठ दिवसाची रजा टाकली होती. ती तिथेच होती व औषध पाण्यावर स्वतः मी देखरेख करीन असे स ला म्हणाली म्हणून सतिश दुपारी 12 च्या बसने मुंबईला आला व विमानाने कलकता. लगेचच पुण्याला फोन केला की मी सुखरूप पोचलो उद्या सकाळी 6 च्या विमानने भुवनेश्वरला जाईन. माझ्या मते सतिशने निघायलाच नको होते तिथून (पुण्याहून). त्याने फोनवर जरी मुख्य सेक्रेटरीना सांगितले असते व महिन्याची रजा घेतली असती तरी चालले असते. तो सकाळी 6 च्या विमानाने कलकत्याहून भुवनेश्वरला जाणार होता हे नियतीला पटले नसावे. पहाटे 4लाच दीदीचा फोन आला -- आबू झोपेतच गेले तू भुवनेश्वरला न जाता मुंबईला परत ये व तिथून पुण्याला. मी इथून फोनवर सर्वांना कळविते. त्याने लगेच कलकत्ता मुंबई विमान पकडले मुंबईहून वोलवो बसने तो पुण्याला आला. भाचे व जावयाच्या मदतीने मॉमने सर्व तयारी केली होती छोटी दीदी जी डॉक्टर (एमबीबीएस) आहे, ती व तिचे यजमान दोघे आले 3 वाजतां दुपारी. मग पार्थिव उचलले. मी व सृष्टि मात्र त्या दिवशी पोचूच शकलो नाही. आम्हांला अंत्यदर्शन मिळाले नाही. पुढील सर्व विधि नाशिकलाच पार पाडले व उदकशांत मात्र पुण्याला 13व्या दिवशी केली. कारण शिवरात्र व दुस-या दिवशी अमावास्या होती. मी मात्र सृष्टिची 11 वीची वार्षिक परिक्षा असल्यामुळे शनिवारीच परतले सृष्टि मात्र सबंध प्रवासात व नंतरही येताना व जाताना अजिबात बोलली नाही. तिने खूपच हाय खाल्ली होती.

----------------------------------------------------------------------